# “ત્યાચા હિજાબ”

– મેધા મરાઠે

ઘરકામ સંપવતાના જમીરચં અમરચ્યા હોકેકડે લક્ષ હોતં. સાહેબાંની દિલેલા મોબાઇલ કસા વાપરાયચા તે અમર ત્યાલા શિકવિણાર હોતા. “જમીર... કમ હિઅર...” ભાજ્યાંચં કટિંગ કરત કિચનમધ્યે ઓટ્યાજવળ ઉભા અસલેલા જમીર બાહેર આવલા. અમર ત્યાલા શિકવૂ લાગલા, “હે બઘ.. અસં કરાયચં સ્ક્રીનિંગ.. અરે વા, તુલા ચટકન જમાયલા લાગલં કી... મમા મ્હણતે તસં, તૂ સ્વતંત્ર ઇંટેલિજન્ટ આહેસ.. આતા હા મોબાઇલ તુઝા.. ચલ, મલા સોડ ક્લાસલા.. ઉશીર હોઈલ...” અમરલા ડબલસીટ ઘેઊન જમીર બૅડમિંટન હૉલકડે સુટલા. ત્યાચે નિળસર ડોળે ખુશીને ચમકત હોતે.

કાબૂલ શહરાબાહેરચ્યા ખડબડીત રસ્ત્યાંવરૂન સાયકલ દામટત જમીર ઘરી પોહોચલા, તેવ્હા અંધાર દાટૂન આણાણ વારા સુટલા હોતા. ત્યાચં મન માત્ર વાર્યાપેક્ષા હલકં ઝાલં હોતં. સાયકલ ઘરાત ઘેત તી ઓબડધોબડ ભિંતીલા ટેકવૂન ઠેવત તો ઓરડલા, “અમ્મી..!” બાહેરચ્યા મોડક્યા ખુર્ચીવર બસૂન શિલેલ્યા દદ્દાંનં ખોકલ્યાચી ઉબળ આવરત મ્હટલં, “પાની લાઓ જમીર..” થોડં ચિડૂનચ જમીરનં ઘરાતીલ રાંજણાતલં ગાર પાણી આણૂન દદ્દૂલા દિલં. તોચ મશિદીતૂન બાંગ સુરૂ ઝાલી આણિ દદ્દૂ કસેબસે ગુડઘે ટેકત નમાજાસાઠી જમિનીવર બસલા. દદ્દૂચ્યા કપાળાવરીલ કાળપટ ખુણેકડે બઘત જમીરનં નાખુશીનં ગુડઘે ટેકલે.

નમાજ સંપતા સંપતા અમ્મીનં આતલ્યા ખોલીતૂન થાળ્યા સરકવલ્યા. નાન આણિ ફિકા ચહા. જમીરનં એક થાળી દદ્દૂપુઢે ઠેવલી. દુસરી ઘેઊન તો કોપર્યાતલ્યા અંથરુણાજવળ ગેલા. “ચાચૂ.. ઉઠ.. ખાના...” ચાચાલા કોરડેત હાત ઘાલૂન ઉઠવતાના જમીરચ્યા લક્ષાત આલં, ચાચૂચે ફાર દિવસ ઉરલે નાહીત આતા. પૂર્ણ કાળવંડલેલા રંગ, ઠણકટ ચાચૂ હળૂ હાત હલવત આવકાશ નાન ચઘળત હોતા. મગ ત્યાચ્યાકડે દુર્લક્ષ કરત જમીર જમિનીવર બસૂન મકોત નાન ખાત રાહિલા. ઘરાતલા પુઢચ્યા એક સીરેચ્યા બલબ દારણાચ્યા અંધારાલા રેટત હોતા.

રિકામ્યા થાળ્યા ઘેઊન જમીર અંધારાતૂન સાવકાં ઘરાત ગેલા તેવ્હા હસીબા રોગડીતલા વિસવ કમી કરત હોતી. પાયઘોળ હિજાબ કાઢૂન ઠેવૂન કેસ મોકળે સોડલેલી અમ્મી, જમીરલા નવીનચ દિસાયચી. પાઠમોરી અમ્મી

SALECHA

अगदी मखमलसारखी छान दिसतेय... जमीरच्या मनात आलं.

“मला सायबांनी मोबाइल दिला.. बघ.. अम्मीला कळव..” हर्षवानं मागे वळून पाहिलं. डोंगरीच्या मंद उजेडात जमीरच्या नुकताच मिसरूड फुटलेला चेहरा बघून तिला हसू आलं... हा पुरुष व्हायला लागला... दद्दू, चाचा, अहमद.. आता जमीर... ती एकदम शहारली. “अम्मीला मोबाइल दाखवायची घाई झालीय?... ती पायथ्याच्या दानपेटीवर असेल...” बाराखोरांनी अर्धवट ढासळलेल्या भिंती ओलांडत धरणाच्या मागच्या बाजूला आल्या जमीरला फिकट अंधारातली अम्मीची पाणी खेचणारी लहानसर आकृती दिसली. त्या अंधारातही तिच्या अंगावर हिजाब होताच. तिच्याजवळ जात तिला थांबवत तो म्हणाला, “मला सायबांनी दिला मोबाइल... बघ... तुलाही फ्रेंडशी बोलता येईल...” जमीर उत्साहानं बोलत राहिला.

अमर असंच बोलायचा नेहाशी. प्रेमानं, गोड. बहिणीशी असं वागणं, बोलणं जमीरला नवीन होतं. अमर नेहाशी बॅडमिंटन खेळायचा, ती पडली तर तिला औषध लावायचा, तिला खायला घालायचा... बहिणीशी असं चमत्कारिक वागणं जमीरनं त्याच्यासारख्या परतून डोळ्यांत कधी नव्हतं पाहिलं. पण आता त्याला ते आवडू लागलं होतं. पूर्वी तो काम करायचा ती अमेरिकेची फॅमिली चांगली होती. त्यांच्या बोलण्यामुळे तो इंग्रजी बोलायला लागला होता. पण ही इंडियन फॅमिली मस्तच होती. साहेब तर मॅडम, अमर आणि नेहाला घेऊन बाहेर जायचे... आपला अब्बू असता तर असा वागला असता का... जमीरला प्रश्न पडला होता.

अब्बूची आठवण होती जमीरला. तो आणि सगळे चाचू दौडत यायचे पहाडातल्या मोठ्या घरी. तेव्हा ते काबूलला राहात नव्हते. घरी खूप बायका, मुलं आणि फक्त दद्दू. मर्द लोक कधीमधी चुकारपणे येणाऱ्या आकाशातल्या काळ्या ढगांसारखे यायचे, आले की खायची प्यायची चंगळ, घरातली बकरी मारणं, जल्लोष, अब्बूच्या बंदुका घेऊन फैऱ्या झाडण्याचा खेळ, अब्बूच्या जमातमधल्या कहाण्या... मजा असायची. अब्बूच्या टोळीचा कुणी एक सरदार होता म्हणे. तोच त्यांना खायला प्यायला आणि बंदुका आणून द्यायचा. त्यानं ‘ऑर्डर’ दिली की कुणावर हल्ला करायचा, मारायचं, नाचायचं. अफगाणि-

स्थानातून परक्यांना हाकलून देण्यासाठी जिहाद करायला सांगायचा तो.

...मग हे सगळं हळूहळू कमी कमी होत गेलं होतं. आबू, चाचा लोकांचं येणंही. जमीरची अम्मी, घरातल्या इतर बायका, दिवसभर रणरणत्या उन्हात सपाटीवरच्या खालच्या शेतात काम करायच्या. जमीर आणि त्याची सगळी भावंडं बकऱ्यांचे मेंढे मोठे कळप पहाडावर चरवायला घेऊन जायची. दुपारच्या वेळी उन्हाच्या कहारात शेतात फुललेली अफूची जांभळी पांढरी फुलं खूप छान दिसायची. पायघोळ हिजाब आंघरून शेतात चटचट काम करणारी अम्मी, चाची आणि इतर बायका लांबून काळ्या बाहुल्यांप्रमाणे मजेशीर दिसायच्या. दद्दू घोड्यावर बसून एका हातात बंदूक तोलत शेताभोवती फिरत राहायचा... आता ते सगळंच संपलं होतं.

रोजच्याप्रमाणे जमीर सकाळी लवकर मॅडमच्या घरी कामासाठी हजर झाला होता. मॅडमनी ऑफिसला जाताना कामांची यादी सांगितली होती. जमीर आता घरकामात तरबेज झाला होता. अमन, नेहा स्कूलबसमधून शाळेला गेल्यावर त्यानं बंगल्यातल्या सगळ्या खोल्या झाडून पुसून स्वच्छ केल्या. मॅडम, साहेबांना सगळं स्वच्छ हवं असायचं. तो स्वतःही कामावर येताना अंग पुसून स्वच्छ कपडे घालून यायचा. हेही त्याला मॅडमनीच शिकविलं होतं. त्यांच्या इंडियात रोज बाथ घेतात म्हणे.... जमीरला वाटलं, किती पाणी फुकट जात असेल आंघोळीपायी... तेवढ्या पाण्यानं आख्खा काबुलची तहान भागली असती. मॅडमशी बोलताना त्याला वाटायचं, त्याची अम्मीच बोलतेय. ऑफिसमधून परतल्यावर त्या स्वतः खाना बनवायच्या. मुलांना खिलवून मग कॉम्प्युटरवर काम करत बसायच्या. कसलं काम ते जमीरला कळायचं नाही. पण त्याच्या सरकारनं या कामासाठी साहेब आणि मॅडमना इंडियातून काबूलला बोलावलं होतं. आणि म्हणूनच जमीरला नोकरी मिळाली होती. काम तर हवंच होतं. दद्दू म्हातारा, पांगळा, चाचू मरण पावलेला, आबूचा पत्ता नाही, अम्मीच्या शिवणकामात भागायचं नाही, असिफाला घराबाहेर पडायची दद्दूची बंदी.. जमीरनं काही-तरी कमवायला हवंच होतं.

लॉन्ड्रीत द्यायच्या कपड्यांचा गठ्ठा मोठ्या सॅकमध्ये घालता घालता जमीर थबकला. मॅडमनी त्यादिवशी पार्टीसाठी हीच साडी नेसली होती, किनारीला पानाफुलांची नक्षी असलेली, ओळखीची. त्याला अचानक आठवलं, अम्मीच्या,

SALECHA

એકા હિજાબાવર અક્ષીચ નક્ષી હોતી કા... જમીર ત્યા રેશમી સાડીવર હાત ફિરવત તિચા મઊ, થંડ સ્પર્શ અલગચ અનુભવત રાહિલા. .. અશી હદ્દી તો હિજાબ પાંઘરત કા નાહી... નેહમી આપલે ભરજરીત કાળે પાંઘરતે.. અર્થાત તિલા કુઠે મ્હણા મૅડમસારખં પાર્ટીલા જાયચં અસતં.. તી ઘરાતચ હિજાબ શિવત બસતે. માહેરચ્યાતૂન એકદા માર્કેટમધલ્યા 'સૌરત' મધ્યે કાપડ નેવઢં આણાયલા યેતે.. દૂરચી માશીનચા આવાજ આણિ તી... સ્વતઃસાઠી કા નાહી એક નક્ષીદાર હિજાબ શિવત.. છાન દિસેલ.. મૅડમસારખી ... જમીર થબકલા. હિજાબ પાંઘરલ્યાવર અમ્મી 'દિસતે' કુઠે? .. ફક્ત દિસતો હિજાબ.. સૌલ, ઠગળ, બટણ.. આતા એવઢીશી અસીસુદ્ધા હિજાબ પાંઘરૂન અસતે. વધૂ ન્હાતારા ઝાલા તરી ત્યાચં તિચ્યાકડે બારીક લક્ષ અસતં.

કામ સંપવૂન ઘરી પરતણ્યાપૂર્વી જમીરનં સાયકલ કાબૂલચ્યા બાજારાત નિળ્યા માશીદીચ્યા કોપ઱્યાકડે વળવિલી. આરેફ, મુરાદ, અલી, નૂર.. સગળે દોસ્ત જમલે હોતે. જમીરચ્યા મોબાઇલલા બઘૂન સગળ્યાંની ગર્દી કેલી. ખુશીત સિગારેટીવર સિગારેટી ઓઢલ્યા. હી ચૌદા પંધરા વર્ષાંચી શાળા અશિક્ષિત મુલં આતા કામ કરત હોતી. કિતીતરી પરદેશી ત્યાંચ્યા કાબૂલમધ્યે આલે હોતે. કાહી બિલ્ડિંગ્સ બાંધત હોતે, કોણી ડૉક્ટર, નર્સ, કોણી ટેલિફોન, ટીવ્હી, કૉમ્પ્યુટર ચાલવત હોતે. સાતત્યાચ્યા યુદ્ધાનં ચિરવળેલ્યા ત્યાંચ્યા દેશાચ્યા ગાડા ઉકલાયલા સગળેજણ કામાલા લાગલે હોતે. આણિ ત્યાંચ્યાકડે ઘરકામ કરાયલા હી પોરં હોતી.. અફગાણી.

"કાલે ટી.વ્હી. વર પિક્ચર પાહિલા... અહા.. નાચ, ગાના... મસ્ત..."

"માઝે સાહેબ ન્યૂઝ લાવતાત.. સગળં જગ દિસતં.. અરે, ~~પોરી~~ પોરીંચી શાળા સુરુ ઝાલી કાબૂલમધ્યે.. કૉલેજપણ.." મુરાદ પડલ્યા ચેહ઱્યાનં મ્હણાલા.

આરેફ ઓરડલા, "છાન છાન પોરી બઘાયલા મિળતીલ.."

"પણ મેડ.. ત્યા હિજાબાત અસણાર.. હે.. હુર્યો.."

સગળ્યાંની આરેફલા ચિડવલં.

"હિજાબ ઘાતલાચ પાહિજે કાય રે?" જમીરને મોઠ્યાનં વિચારલં તેવ્હા સગળી એકદમ ગપ્પ ઝાલી. ..ત્યા કાય એક.. હિજાબ મ્હણજે પાયઘોળ બુરખા, ફક્ત ડોળ્યાંસમોર જાળી..

"આપણ પાયજમા કુર્તા ઘાલતો તસા બાયકાંચા હિજાબ.."

"પણ... ત્યાહી સલવાર કુર્તા ઘાલતાત ના.. શિવાય હિજાબ કશાલા.. મગ.. મગ.. આપણ કા નાહી તો પહનત.." જમીર ગંભીરપણે મ્હણાલા.

SALECHA

सगळ्यांनी हसत आरडाओरडा केला.
"ए चक्रम जमीर.. बायकांनी घालायचा हिजाब.. मर्दांनी नाही.."
"चूक.. तुला ठाऊक नाही ... पूर्वी पुरुष नव्हत्या घालत हिजाब.. मुली शाळेत जात होत्या.. दुसरं राज्य होतं तेव्हा.. मग आमच्या हिजाब? तोही डोक्यापासून पायांपर्यंत.. तालिबानींनी तर पायाचे बोट दिसले म्हणून जोरकडी काठीचे फटके मारले.. आठवतं ना तुम्हाला लहानपणी पाहिलेलं?"
"हा जमीर त्या इंडियनकडे काम करतो ना म्हणून असलं बोलतोय.. चल जाऊ दे..."
"हो. मडम बोलतात माझ्याशी... अफगाणिस्तानचा इतिहास सांगितला त्यांनी.. त्यांच्या इंडियात सुद्धा बायकांना घरात कोंडलं होतं म्हणे. त्या पूर्वी अडाणी होत्या.. आता शिकल्यात इंजिनिअर सुद्धा... जॉब करतात.. बायका शिकल्या म्हणून त्यांची मुलं, मुली शिकतात.. आपली अम्मी शिकली असती तर... आपणही...," जमीरचे डोळे भविष्याच्या कल्पनेने चमकले.
"खरं सांग मुराद, तुला आवडेल तुझी अम्मी, बहीण हिजाब न घातलेली?"
"अं... मला नाही माहीत..."
"मला आवडेल..!"
"मॅड आहेस जमीर.. आपलं ते आपलं.. नकल कशाला करायची?"
उलटसुलट मतांची धूळ उडाली. अगदी हमरीतुमरी. जमीरला प्रश्न पडला 'आपलं' म्हणजे कुठलं? बामियानच्या काळातलं.. अमानउल्लांच्या काळातलं की तालिबानी काळातलं? नवीन जगातलं सगळं घ्यायचं.. पुढे बंदुका, कॉम्प्युटर, टी.व्ही. मग हिजाब टाकणं का नको?
जमीर मित्रांशी वाद घालत राहिला. मतांचे दोन तट पडले.
"तुझा तो रेशमाचा हिजाब कुठे ग अम्मी.. काबुलला आल्यावर तू बाहेर जाताना कधीतरी घालायचीस.. मग घरी परतताना फाटकर बाल येत होतो मशीदीतून.." अम्मीचं मशीन थांबलं होतं. तिच्या चेहऱ्यावरची दुःखाची रेषा जमीरला दिसली नाही.
"मॅडमची लसलशीत साडी आहे.. मस्त.. हिजाब कुठे आहे सांग ना तो..." अम्मीच्या डोळ्यातलं पाणी बघून जमीर कावरा-बावरा झाला. "का रडतेस अम्मी.." अम्मीनं मान हलवत शिलाईच्या पेटीकडे बोट दाखवलं. जमीरनं ती पटकन

जाऊन उघडली. बरेचसे कपडे उसकटल्यावर तळाशी होता तो हिजाब ... नकोसा... अत्तराचा सूक्ष्म वास. त्यानं अलगद उचलला. एखादा काहीतरी खाली पडलं. जुनाट पिवळा फोटो. स्कर्ट, टॉप, हातात स्कूल बॅग घेतलेल्या दोन मुली.. अम्मी नेहासारख्या ... "अम्मी तू आहेस ही... तू शाळा शिकलीस? .. आणि हिजाबाशिवाय ... लिहायला वाचायला येतं तुला?.. मॅडमसारखं..." त्यानं अविश्वासानं विचारलं आणि अम्मीच्या चेहऱ्यावरच्या अम्मीच्या थरथरत्या हातावर जमीरनं आपला उबदार हात ठेवून दाबला. "... आणि ..आम्ही मुली हिजाबात कोंडून ठेवलं.." स्वतःला हिजाबात असल्यासारखं जमीरचा श्वास घुसमटू लागला.

"आम्हाला का शिकवलं नाहीस अम्मी.. मॅडमसारखं... मी कॉम्प्युटर... विमान चालवलं असतं..." अम्मीच्या डोळ्यांतून पहाडातल्या घरांवरच्या उंच भागातून उतरणारा झरा वाहत होता. जमीरच्या डोळ्यांसमोर पहाडातलं घर आलं. तो आणि घरातली मुलं बकऱ्या चरवायची, पाटी पेन्सिल त्यांनी हातात धरली नव्हती. अम्मी आणि इतर बायका अब्बूच्या शेतात राबायच्या, अन्न शिजवायच्या, लाकडं, पाणी आणणं, शिवणं.. बस्स तेच आणि तेच. पुस्तक नाही की लिहिणं नाही.. और हो, त्या घरात पुस्तकं होती कुठे? बायकांनी लिहिणं वाचणं अल्लाला मंजूर नाही, म्हणायचा दद्दू. त्यांनी फक्त काम करायचं ... पायघोळ हिजाब पांघरून. झऱ्यावरून पाणी आणताना एकदा चाचीचा बुरखा हटला होता तर चाचूनं बंदुकीच्या दस्त्यानं तिच्या चेहऱ्यावर हाणलं होतं. डोळ्यापासून ओठांपर्यंत त्याची मोठी खूण होती शेवटपर्यंत. अब्बूच्या शत्रूंनी घरात गोळीबार केला होता तेव्हा अम्मी त्याला आणि आईशाला घेऊन पहाडावरच्या खिंडमागे दडून बसली होती. बंदूकवाले निघून गेल्यावर ते घरी परतले तेव्हा रक्तबंबाळ उघड्यावाघड्या बायका त्याला ओळखू येईनात. हिजाबाशिवाय त्यांना कधी त्यानं पाहिलंच नव्हतं. चाचीच्या चेहऱ्यावरील दस्त्याच्या खुणेवरून तिला तेवढं ओळखलं होतं. काबूलहून परतलेल्या दद्दूनं त्या सगळ्यांना गाडलं होतं.

पांगळा चाचू, पराभूत वाकलेल्या दद्दूला घेऊन अम्मीच मग जमीर, आईशाला जपत बॉम्बनं उद्ध्वस्त काबूलमध्ये आली होती. अब्बूचा तर पत्ताच नव्हता. पोटात भरवंडी भूक ... "अम्मी, खायला नान तरी दे ना..." काळवळून

SALECHA

त्यांनी अम्मीकडे हट्ट धरला होता. शेवटी अम्मी ढकलल्यासारखी उठली होती. तो नक्षीवाला पायघोळ रेशमी हिजाब पांघरून, कायद्याप्रमाणे आठ वर्षांच्या 'पुरुष' जमीरला बरोबर घेऊन आरेफच्या अम्मीसह अखेर ती घराबाहेर पडली होती. संध्याकाळच्या वेळी काबूलच्या अंधाऱ्या गल्लीतल्या पडक्या घराच्या पडवीत तो आणि आरेफ घाबरून बसले होते, कितीतरी वेळ, चित्रविचित्र चेहऱ्याची अनोळखी माणसांची ये-जा बघत. त्या घरात जाताना अम्मीनं बजावलं होतं, "आत येऊ नका, इथेच खेळा, झोपा, मग नान देईन पोटभर." अम्मी केव्हातरी बाहेर आली होती. झोपलेल्या त्या दोघांना उठवून ती सगळी नान खरेदी करायला गेली, जेव्हा भट्टीवाल्यानं नान देईपर्यंत त्यानं आणि आरेफनं भट्टी-बाहेरचे नानचे शिळे तुकडे वेचले होते. घरी पडक्या घरी आल्यावर अम्मीनं दद्दू, चाचू, अर्शी आणि त्याला चहाबरोबर ताजे नान खायला दिले होते. "तुला भूक नाही का ग..." नान खाता खाता जमीरनं तिला विचारलं होतं. अम्मीनं उत्तर दिलं नव्हतं. नंतर कुकरीत बसून ती नानचे शिळे तुकडे पाण्यात भिजवून खात असलेली त्यानं बघितली होती... शिकलेली अम्मी नोकरी करू शकत नाही.. चोरट्या घरात हिजाब पांघरून जाते.. घरातल्यांना जगविण्यासाठी काय काय सोसतेय.. जमीरला स्वतःचा तिरस्कार वाटला.. तालिबान्यांच्या कोरड्या काठीचे फटके स्वतःच्या पायांवर मारून घ्यावे वाटले.

दद्दूनं शेवटी अर्शीला परवानगी दिली होती, फ्रेंडच्या शादीला जाण्याची. दोन दिवस ती तिच्याकडेच राहणार होती. जमीर अर्शीला घेऊन फ्रेंडच्या घरी सोडण्यासाठी निघाला. चालत जाण्याची पुरा तासाची वाट. अर्शीच्या कपड्यांची पिशवी कॅरियरला लावून पद्धतीप्रमाणे जमीर सायकल ढकलत पुढे चालत होता. संध्याकाळची निर्जन वाट. "तुला हिजाब आवडतो अर्शी..." त्याचा अचानक प्रश्न ऐकून अर्शीला आपला हिजाब हाताने घट्ट धरत गपकन उभी राहिली. जमीर मागे वळून थांबला. "नाही घातला तर दद्दू जीव घेईल माझा.." "तू डी.व्ही.डी. वर बघ.. बाकीच्या देशातल्या बायका हिजाब टाकून देताहेत.. शिकताहेत..." जमीरच्या डोळ्यात आश्वासन होतं. "पण... ऑसिड फेकतील मग..." थरथर कापत अर्शी बोलली. तिच्या शब्दांनी जमीर गोठून गेला. मग हळुवारपणे म्हणाला, "मग, पण मी आहे तुझ्याबरोबर..." अर्शी जमीरकडे नि:शब्द बघत राहिली. लांबवर

पसरलेल्या वाळूत निष्पर्ण साकाळी उभा समीर निळे आभाळ-
ले टेकल्यासारख्या वाटल्या.

बरोबरीनं चालत दोघंही थोडावेळ गप्प होती. मग त्याने असीला म्हटलं, "तू त्या दिवशी कोणतरी गाणं गुणगुणत होतीस.. कुणी शिकवलं तुला.. मस्त होतं.. मॅडम गुणगुणत नसं..." असी घाबरून समीरकडे पाहू लागली. "घाबरू नको... मला आवडलं.. म्हणून.. कुणी सुद्धा नाही इथे.." असीनं मागेपुढे पाहिलं. समोर पांढऱ्या वाळूवर दुमंगलेली वाट अस्पष्ट होती. खूप दूरवर एक दिवा प्रकाशत होता.

"..जन्मते पुन्हा पुन्हा.. उरले प्रेम लेवढे.. वाटतेले काटे आन ... ओलांडून चालेन मी... चालेन मी..." असीला ओठातल्या ओठात गुणगुणू लागली.

"कुणी शिकवलं तुला?"

"अम्मीनं... गोड गाते ती... पहाडातल्या घरी मर्द नसले की अम्मी आणि सगळ्या चाची गायच्या.. हसायच्या.. मला अंधुक आठवतंय.. तुला नाही आठवत? अम्मीला तिच्या अम्मीनं शिकवलं होतं म्हणे...."

असीलाच्या फ्रेंडचं घर जवळ आलं. समीर तिला सोडून परत फिरणार होता. "असी, कसं वाटलं ग हिजाब घातल्यावर.. सांगशील मला.. मोकळेपणानं..." असी सुन्नपणे गप्प बसली. मग अचानक म्हणाली, "..तूच घालून बघ हिजाब एकदातरी..." घरात शिरणाऱ्या पाठमोऱ्या असीकडे तो पाहात राहिला.

निळ्या माहिरीच्या कोपऱ्यावर वाद सुरु होता. "आपण काय करु शकतो.. धर्मानंच ते ठरवलंय.." "धर्मानं म्हणजे कोणी रे.. आणि कुर्आन नाही इस्लाम? पण पायघोळ हिजाबाची सक्ती नाही.." "ती बायकांची गोष्ट, त्यासाठी त्यांनी काय ते करावं..." "अरेच, आपल्या सगळ्यांच्या घरात पुरुष नव्हते, सगळे मेलेले नाहीतर तुरुंगात. आपली अम्मी हिजाब घालून बाहेर पडली मदरसारखी आणि जगली आपण.. काय काय केलं नाही त्यांनी..." सगळ्यांच्या डोळ्यांत त्या आठवणींनी रिक्तता दाटली. "...अफगाणी बाईचं चित्र बघितलंस नीट.. पायघोळ बुरखा, कडेवर पोर, अनवाणी पायांनी जातेय नवऱ्यामागे... बदलू या ते चित्र.. निदान तिचा आवाज बंद करणारा, घसनटून शकणारा पायघोळ हिजाब तरी नको... पुढचं नंतर करु या.. बदलू या ते चित्र तू.. मी.. आपण..."

SALECHA

सगळे जमीरकडे बघू लागले.

दोन तासांनी सुट्टी घेऊन जमीर अम्मी आणि अफ्शीला कापडखरेदीसाठी 'सिरत' मध्ये सोडून आला आणि घरकामाला लागला. 'पुरुषांच्या सोबतीशिवाय त्या घराबाहेर पडू शकत नव्हत्या, यात दोष कुणाचा...' जमीर विचार करत असतानाच त्याचा मोबाइल वाजला. "यस मॅडम.. काय.. कुठे.. मार्केटमध्ये?.. हो.. मी जातो.. सिरतमध्ये.. कळवतो.."

मार्केटमधल्या चौकात बॉम्ब फुटला होता. खूप माणसं मेली होती. 'नको ग अम्मी मरू.. तू आणि अफ्शीच उरल्यात माझ्यासाठी..' सायकलचं पेडल जोरजोराने मारत मारत जमीर रडत राहिला, "पख्तूनी मर्द रडत नसतात" हे दद्दूचं वाक्य आठवलं.

चौकात ढासळलेल्या इमारती, माणसांचे लोंढे, रडारडी, पोलिस, रडणं, आरडाओरडा, रक्तमांसाचा चिखल, विव्हळणं.. माणसांची अस्ताव्यस्त प्रेतं.. 'सिरत'ची पडक्या भिंतीवर लोंबकळणारी पाटी.. काळ्या हिजाबातून बाहेर आलेला एक पालथा हात हलला. पोलिस धावले.. जमीरही.. अम्मी..अम्मी.. पोलिसानं हिजाबवालीला उताणं वळवलं.. सगळी चकित झाली. ती अम्मी नव्हती.. तो पुरुष होता.. हिजाबाच्या आत दडलेला.. जागोजागी फाटलेल्या अंगाला लोंबणाऱ्या बॉम्ब बांधलेल्या पट्ट्या. छी:.. हिजाबाच्या आत दडून शौर्य गाजवणारा नामर्द...

अम्मी आणि अफ्शी सुखरूप होत्या. कुठल्यातरी संघटनेनं स्फोटाची जबाबदारी स्वीकारली होती. पुन्हा काबूल नेहमीसारखं सुरू झालं. जमीरला वाटलं, हे नामर्द खातात, पितात, झोपतात, बायकांना लाथा घालतात, हिजाबात कोंबतात, घरात कोंडतात आणि बायका घुसमटतात, मार खातात, मरतात.. मरतातच.. हा देश मेलाय.. मी, अमीन, मुराद, अली, आरेफ, नूर.. सगळेच मेलेत.. त्या हिजाबवाल्यासारखे.. मग जमीर स्वतःच्या मनाचा हिजाब फाडायला लागला.. टराटरा.. चिंध्या चिंध्या केल्या त्यानं त्याच्या...

८ मार्च. विमेन्स डे. काबूलला मोठी कॉन्फरन्स भरली होती. बायकांना काही अधिकार देण्याविषयी पुरुष चर्चा करणार होते.. फक्त चर्चा.. इमारतीबाहेरील बंद गेटा-जवळ पोलिस सज्ज.. बंदुका रोखून.. नेहमीप्रमाणेच..

गेटापलीकडच्या रस्त्यावर जमीर, मुराद, अली, आरेफ... सगळे उभे होते. सगळ्यांच्या अंगावर

हिजाब पांघरले होते, पायघोळ, चेहऱ्यावरील पडदा मागे टाकला होता. रस्त्यावरून येणारेजाणारे कुतूहलाने बघत होते. जमीर त्यांना हिजाब वाटत होता. मुराद, अली बॅनर नाचवत होते... 'डोन्ट टेल वीमेन व्हाट टु वेअर?'. 'रस्त्यावर या आणि हिजाब घालून पहा', 'हिजाब म्हणजे अंधारकोठडी', 'फेकून द्या हिजाब', 'निळा चेहरा द्या...'

सगळ्यांचे चेहरे निर्भय होते... दुर्मिळ पावसाची धुंद हलकी सर काबूलच्या वाळवंटात रिमझिमली.